# महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt. Dental College & Hospital Building, St. George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel. No. +91-22-22620361-65 (Extn. 317/323) Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax: +91-22-22620562/22652168 Website: http://www.dmer.org


क्र.संवैशिवसं/एमएचटी-सीईटी-२००९/बीएएमएस व इतर/रिक्त जागा/नोटी-१५/१-अ, दिनांक :२५/११/२००९

**एमएचटी- सीईटी २००९**

**नोटीफिकेशन**

**शासकीय व शासन अनुदानित बी.ए.एम.एस. / बी.यु.एम.एस.**
**महाविद्यालयांच्या रिक्त जागा भरणेबाबत**

सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, नवी दिल्ली यांच्या निर्देशांच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता आयुर्वेद आणि युनानी अभ्यासक्रमाची प्रवेशाची अंतिम दिनांक (कट-ऑफ-डेट) ३० नोव्हेंबर, २००९ अशी वाढविण्यात आली आहे. ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता केंद्रीय परिषदेची परवानगी प्राप्त झालेली आहे अशा उपरोक्त अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील रिक्त असलेल्या सवर्गनिहाय जागांवरील प्रवेशासाठी एमएचटी-सीईटी २००९ च्या गुणवत्ता यादीतील इच्छुक विद्यार्थ्यांनी खालील सूचना आणि वेळापत्रकाची नोंद घ्यावी.

| क्र. | सूचना | वेळापत्रक |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी व्यक्तिशः त्यांना हव्या असलेल्या महाविद्यालयात प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी.(एमएचटी-सीईटी २००९ च्या गुणपत्रिकेची आणि सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायाप्रतींसह) | ३० नोव्हेंबर, २००९ सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| २. | महाविद्यालयाने त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जांमधून गुणवत्ता यादी तयार करुन ती महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशित करणे. | ३० नोव्हेंबर, २००९ (दुपारी १२.०० वाजता) |
| ३. | **गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्राप्त होणाऱ्या रुजू होण्याचा कालावधी. सदर प्रक्रियेच्या वेळी विद्यार्थ्यांकडे सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे आणि शैक्षणिक शुल्क असणे आवश्यक आहे.** | ३० नोव्हेंबर, २००९ सायं ५.३० वाजेपर्यंत |
| ४. | **प्रवेशाचा अंतिम दिनांक (कट-ऑफ-डेट)** | **३० नोव्हेंबर, २००९** |

उपरोक्त महाविद्यालयांनी वर नमूद केलेल्या सूचना आणि वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सही/-**
**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**